फॉन्टफ्रीडम मायबोली

**One of the Lowest Airfares**
Over 100 flights across India. Special exclusive offers. Book now.
HTTP://WWW.YATRA.COM

**India Travel Agency**
Our company is specialized in tours in India. Best deals available.
http://www.hirecarinindia.com

# अमेरिकेतील बृहन् महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनाची तयारी सुरू

(१३-०१-२००८ : १:५१:१०)

पुणे, दि.१२ (प्रतिनिधी) : अमेरिकेतील फिलाडेल्फिया येथे भरणाऱ्या बृहन् महाराष्ट्र मंडळाच्या चौदाव्या द्वैवार्षिक अधिवेशनाची जय्यत तयारी सुरू झाली आहे. २००९ मध्ये २ ते ५ जुलैदरम्यान होणाऱ्या या अधिवेशनासाठी अमेरिकेतून सुमारे पाच हजार व भारतातून एक हजार मराठी प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.
त्याबद्दल अधिवेशनाचे संयोजक मुकुंद कुटे, सहसंयोजक मंदार जोगळेकर व किशोर गोरे यांनी पत्रकार परिषदेत अधिक माहिती देताना सांगितले, ''अमेरिकेतील २० लाख भारतीयांपैकी सुमारे दहा टक्के मराठी भाषक आहेत. बृहन् महाराष्ट्र मंडळ अमेरिकेतील चाळीसपेक्षा जास्त मराठी मंडळांचे प्रतिनिधित्व करते. एक दशलक्ष चौरस फूट इतक्या भव्य जागेत हे अधिवेशन होणार आहे. मराठी उद्योजकांना मदत करण्याच्या हेतूने त्यांच्या उत्पादनांची ग्राहकांना माहिती व्हावी, यासाठी औद्योगिक प्रदर्शनही अधिवेशनादरम्यान आयोजित करण्यात येणार आहे. महाराष्ट्र, गोवा व अमेरिकेतील पेनसिल्व्हानिया या तीन राज्यांच्या संयुक्त विद्यमाने या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. मराठी डॉक्टरमंडळींना वैद्यकीय क्षेत्रातील नवीन घडामोडींसंबंधी अद्ययावत ज्ञान प्राप्त करून देण्याच्या उद्देशाने त्यांच्यासाठी एक स्वतंत्र परिषदही भरविण्यात येणार आहे.''
महाराष्ट्र व गोव्यातील अधिकाधिक मराठी भाषकांना अधिवेशनास उपस्थित राहण्यासाठी अमेरिकेचा व्हिसा लवकरात लवकर मिळण्याच्या हेतूने प्रयत्न केले जात आहेत. त्यासाठी महाराष्ट्रीयन टुरिस्ट कंपन्यांचे सहकार्य घेतले जात आहे. महाराष्ट्रातील कलावंतांचा अमेरिकेत वाढणाऱ्या तरुण मराठी पिढीशी संवाद घडवून आणण्याच्या उद्देशाने त्यांनाही अधिवेशनास आमंत्रित करण्यात आले आहे. अधिवेशनामध्ये सहभागी होण्यासाठीची नावनोंदणी पुढील वर्षीच्या १ जानेवारीपासून सुरू होत असून, त्यासाठी एकशे पन्नास अमेरिकन डॉलर इतके शुल्क असणार आहे.
अधिक माहितीकरिता मुंबईतील डॉ. प्रदीप पालशेतकर यांच्याशी (०२२) २३६४३३८९ अथवा पुण्यातील राजेंद्र वैशंपायन यांच्याशी (०२०) २४३२१०४२ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.
,.ला२००९हिळश्ररवशश्रहिळर.ेस या मंडळाच्या वेबसाईटवरूनही अधिवेशनाबद्दलचा आवश्यक तपशील कळू शकेल.

या बातमी वरील वाचकांच्या प्रतिक्रिया

ही बातमी प्रिंट करा | ही बातमी मित्राला इ-मेल करा | आपली प्रतिक्रिया

Ads For Indians

**Delivery of Flowers and Gifts**
Assured and guaranteed delivery of Gifts all over Punjab.

**Life Bliss Meditation Workshop**
We are arranging a comprehensive two-day meditation workshop

Archives | About Us | Feedback | Contact

Copyright : Lokmat Newspapers Ltd - 2007
Developed, Hosted and Maintained by
MasterMind Technologies, Mumbai

News Static Page Generated on:13-1-2008 at 2:49